**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अकृषिक कर पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय; जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक आणि लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळं स्थापन करण्यास मान्यता.**
2. **पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या विविध योजनांच्या लाभ वितरणासह वाशिम जिल्हयातील पोहरादेवी इथं 'बंजारा विरासत' नंगारा म्युझियमचं करणार लोकार्पण.**
3. **महाराष्ट्रातली बौद्ध धर्म आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित स्थळं तसंच स्मारकं यांचा विकास करणार असल्याचं केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरण रिजिजू यांचं नागपुरात प्रतिपादन.**
4. **मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे मानले आभार; सर्व क्षेत्रातून निर्णयाचे स्वागत.**

**आणि**

5. **पाच पूर्णांक ६७ किमी लांबीच्या एलआयसी चौक ते ऑटोमोटिव्ह चौकापर्यंतच्या डबल डेकर उड्डाणपूलाचं उद्या लोकार्पण.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मंत्रिमंडळ निर्णय

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज पार पडली. राज्यातील अकृषिक कर आकारणीचा जनतेवर पडत असलेला बोजा पूर्णपणे संपवण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सध्या गावठाणांमध्ये असणाऱ्या जमिनीवरील अकृषिक कर कायमस्वरुपी माफ आहे. मात्र गावठाणाबाहेर रहिवासी घरांची संख्या वाढत असल्याने आणि शहरी भागात बहूमजली इमारती वाढत असल्याने अशा इमारतींखालील जमिनींचा संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनीवरील अकृषिक कर रद्द करण्यात येणार आहे. शिवाय राज्यातील महसूल न्यायाधीकरणांच्या अध्यक्ष आणि सदस्य पदांवर नियुक्तीसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. आज झालेल्या अन्य निर्णयात राज्यातील प्राचीन आणि ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षांच्या तुरूंगवासाची तसेच एक लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्वल करणाऱ्या खेळाडूंना आणि त्यांच्या प्रशिक्षकांच्या पारितोषिकांच्या रक्कमेत वाढ करण्याचा निर्णय देखील आज घेण्यात आला. राज्यातील लहान जलविद्युत प्रकल्पांचे व सहःस्थित सौर ऊर्जा प्रकल्पांचे खाजगीकरणातून बांधा, वापरा व हस्तांतरण करा (BOT) तत्वावर विकास करण्याच्या धोरणास देखील मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक,

लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी - दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पाच ऑक्टोबरला राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. वाशिम इथं होणाऱ्या कार्यक्रमात बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या, वाशिम जिल्हयातील पोहरादेवी इथं 'बंजारा विरासत' नंगारा म्युझियमचे लोकार्पण मोदी यांच्या हस्ते, होणार आहे. या कार्यक्रमास राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि अजित पवार कार्यक्रमाचे आयोजक तथा यवतमाळ-वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड आदी उपस्थित राहणार आहेत. याशिवाय पी.एम. किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांचे ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीतला अनुक्रमे १८ वा आणि पाचवा हप्ता मोदी यांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहे. त्यानंतर ठाणे इथं मुंबई मेट्रो लाईन तीन सह विविध विकास कामांचं उद्घाटन आणि लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. ठाणे महानगरपालिकेच्या नवीन इमारतीचं भूमीपूजन, नवी मुंबई विमानतळालगतच्या परिसरातल्या विविध कामांची सुरुवात यावेळी होणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पंतप्रधानांच्या या दौर्याचा आढावा घेऊन, कार्यक्रम स्थळांची पाहणी केली.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव

कोणत्याही परिस्थितीत रेल्वेचं खासगीकरण होणार नाही, अशी ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. ते आज नाशिकमध्ये रेल्वे सुरक्षा बलाच्या चाळिसाव्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात संचलनाचं निरीक्षण केल्यानंतर माध्यमांशी बोलत होते. गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारने रेल्वेमध्ये विविध माध्यमातून गुंतवणूक केली आहे. सध्या काही राजकीय पक्ष रेल्वेच्या खासगीरकणाबद्दल भ्रम निर्माण करत आहेत, मात्र असं काहीही होणार नाही, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

किरेन रिजीजु

महाराष्ट्रातली बौद्ध धर्माशी संबंधित तीर्थस्थळं आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित स्थळं तसंच स्मारकं यांचा विकास करण्यात येणार असल्याचं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी आज सांगितलं. नागपुरातील दीक्षाभूमीचे दर्शन आपल्यासाठी विशेष असल्याचं सांगत इथे आपल्याला प्रेरणा आणि दिशा मिळते असं देखील ते म्हणाले. नागपूरमधे पवित्र दीक्षाभूमीचं दर्शन घेतल्यानंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

***(होल्ड बाईट रिजिजु ३० सेकंद)***

***बाबासाहेब आंबेडकर के बारे में सबको मालूम है । कुछ सत्य ऐसा है जिसको सबको मालूम होना चाहिए मेरे लिए जो विशेष करके आंबेडकर जी और वह पूरा बोद्ध समुदाय का दिल से गहराइयों से मेरा लगन तो है, मेरा लगाओ जुड़ा हुआ है । मैं जब भी नागपुर आता हूं, तो यहां तो मुझे आना ही है हम दिल से सिर्फ बाबासाहेब को आपको नहीं मानते बल्कि उनके कर्मों को आगे ले जाने के लिए विशेष ध्यान देना है ।***

या कामासाठी संबंधित सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्था या सर्वांसोबत समन्वय साधण्यात येणार असल्याचं ते म्हणाले. किरेन रिजीजू आज प्रदेश भाजप कार्यालयातर्फे आयोजित बैठकीत सहभागी झाले. दरम्यान, देशातील मुस्लिम समुदाया मधील वंचित तसेच मागासवर्गीय हे दयनीय अवस्थेत असून काही मोजक्या मुस्लिमांना फायदा पोहोचवण्यासाठी तसेच वक्फ जमिनीवर कब्जा करण्यासाठी विरोधक वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध करत असल्याचा आरोप केंद्रीय

अल्पसंख्यांक मंत्री किरण यांनी आज नागपूर मध्ये पत्रकार परिषदेत केला. या विधेयकाच्या माध्यमातून मुस्लिमातील वंचित घटकांना न्याय देण्याचा आपला प्रयत्न असल्याचं देखील त्यांनी स्पष्ट केलं. मणिपूर मधील हिंसाचार हा जातीय तसेच वांशिक कम्युनिटीच्या परस्पर संघर्षातून होत असून केंद्र शासन त्यावर योग्य ती कारवाई करत आहे. लष्करी कार्यवाही हा या हिंसाचारावर उपाय होऊ शकत नाही असं देखील रिजीजू यांनी स्पष्ट केलं.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी

नागपूरच्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं इन्कम टॅक्स ॲपलीट ट्रेब्युनल अर्थात आयकर अपील लवाद सदस्यांकरिता तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन आज केंद्रीय न्याय आणि विधी राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते झालं. याप्रसंगी मेघवाल यांनी आयकर कायद्यासंदर्भातील अपील स्वरूपाच्या अत्यंत गुंतागुंतीच्या केसेस, भारतातील अधिकारी इतर पाश्चात्य सदस्यांपेक्षा योग्य रीतीने हाताळतात असं निरीक्षण नोंदवलं. या तीन दिवसाच्या प्रशिक्षण शिबिरामध्ये जिल्हा न्यायाधीश तसेच विधी अधिकारी हे ट्रेब्युनलचे सदस्य म्हणून उपस्थित राहतील. आयकर लवादातील सदस्यांनी त्यांच्यासमोर आलेल्या प्रकरणांचा स्वॅट अर्थात स्ट्रेंथ विकनेस अनालिसिस टेस्ट करून योग्य प्रकारे निकाल लावला पाहिजे. या क्षेत्रात खूप आव्हाने आहेत परंतु या तीन दिवसीय प्रशिक्षणातून या क्षेत्रातील अनुभवी तज्ञांकडून उपयुक्त प्रशिक्षण मिळणार असल्याचं मेघवाल यांनी सांगितलं.

राहुल गांधी

काँग्रेस नेते आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी आजपासून दोन दिवस कोल्हापूरच्या दौऱ्यावर येत आहेत. आज कसबा बावडा इथल्या भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण त्यांच्या हस्ते होणार असून, उद्या ते संविधान सन्मान संमेलनाला उपस्थित राहणार आहेत.

मराठी अभिजात दर्जा

मराठीसह पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत. "समस्त महाराष्ट्राच्या आणि मराठी भाषेच्या इतिहासात हा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल असं त्यांनी सांगितलं. संत ज्ञानेश्वर माऊली, संत चक्रधर स्वामी, जगद्गुरू संत तुकाराम यांसह महाराष्ट्रातील अनेक संतांची आणि समाजसुधारकांची भाषा असलेल्या मराठीला अभिजात भाषा जाहीर झाल्यामुळे सन्मानप्राप्त झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, लोकमान्य टिळक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसह असंख्य स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारक तसेच जनसामान्यांच्या लाडक्या मराठी भाषेचा सन्मान प्रत्येकाला सुखावणारा आहे, असं राज्यपाल म्हणाले. दरम्यान, काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. या निर्णयाबद्दल आपली प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले -

***(होल्ड बाईट -फडणवीस - ३० सेकंद )***

***आपली मराठी भाषा ही अभिजात भाषा म्हणून गणली जाणार आहे. हा सुवर्ण अक्षरांनी लिहिण्याचा दिवस आहे. महाराष्ट्र सरकारने मी मुख्यमंत्री असताना आणि आता देखील माननीय एकनाथराव शिंदेजींच्या नेतृत्वात सातत्याने पाठपुरावा केला, प्रयत्न केला, पुरावे दिले आणि आज हे सगळे पुरावे***

***मान्य होत, मराठी भाषा या दिवसात भाषा झाली आहे. महाराष्ट्राच्या 12 कोटी जनतेच्या वतीने आणि जगभरातल्या मराठी माणसाच्या वतीने मी पंतप्रधान मोदीजींचे मनापासून आभार मानतो.***

दरम्यान, तीन ऑक्टोबर हा दिवस यापुढे 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलं आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या निर्णयाचं साहित्य, कला, चित्रपट क्षेत्रासह तळागाळातून स्वागत करण्यात येत आहे.

निरी स्थापना दिन

'भविष्यात पुढच्या पिढीला नैसर्गिक संसाधनाचा तुटवडा जाणवला जाणार नाही यासाठी वर्तमान काळात आपल्या पिढीनं संसाधनाचा अमाप वापर करणं टाळलं पाहिजे' असं प्रतिपादन आयआयटी दिल्लीचे संचालक प्राध्यापक रंगन बॅनर्जी यांनी केलं. वैज्ञानिक आणि संशोधन औद्योगिक महामंडळ अर्थात सीएसआयआरच्या 83 व्या स्थापनादिनानिमित्त नागपुरात राष्ट्रीय अभियांत्रिकी पर्यावरण संस्था-नीरी इथल्या कार्यक्रमात ते बोलत होते. नीरीने आपल्या संशोधन कार्याचा व्याप वाढवून संशोधनाच्या धोरणनिर्मिती मधे महत्त्वाची भूमिका पार पाडली पाहिजे असं त्यांनी सुचवलं. कार्यक्रमादरम्यान बांबू डायव्हर्सिटी ऑफ इंडिया या पुस्तकाचं विमोचन करण्यात आलं. यावेळी संशोधन स्पर्धेत विजय प्राप्त केलेल्या नागपुरातील विविध शाळा, शैक्षणिक संस्था यांना पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.

उड्डाणपूल उदघाटन

तांत्रिक दृष्टया अतिशय कठीण आणि आव्हानात्मक समजला जाणारा एलआयसी चौक ते ऑटोमोटिव्ह चौक हा ५ पूर्णांक ६७ किमी लांबीचा डबल डेकर उड्डाणपूल उद्यापासून सुरु होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उद्या एलआयसी चौकात उद्या दुपारी १२ वाजता कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या प्रकल्पाची किंमत ५७३ कोटी असून अद्ययावत ‘रिब अँड स्पाइन’ तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेला हा देशातला पहिला पूल आहे. या उड्डाणपुलावर गड्डीगोदाम चौक, कडबी चौक, इंदोरा चौक, नारी रोड, ऑटोमोटिव्ह चौक ही पाच मेट्रो स्थानकं बांधण्यात आली आहेत. या उड्डाणपुलामुळे कामठी मार्गावरील वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

*****